0 9 DEC 2025
पुढारी

# दिव्यांग कल्याणासाठी शिवाजी विद्यापीठ कार्यरत : डॉ. ज्योती जाधव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**


दिव्यांग विद्यार्थ्यांना विविध सोयी पुरविण्यात व त्यांचा मुख्य प्रवाहामध्ये समावेशासाठी शिवाजी विद्यापीठ अग्रेसर आहे. येथून पुढेही दिव्यांग कल्याणासाठी विद्यापीठ कार्यरत राहील, असे प्रतिपादन प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातील यूजीसी स्किम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलीटीज व समावेशी शिक्षण संसाधन केंद्र यांच्यातर्फे विद्यापीठासह संलग्नित महाविद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी करिअर गाईडन्स व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या. डॉ. मनोहर वासवानी, बालाजी शिंदे यांनी मार्गदर्शन केले. यानंतर झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात हेल्पर्स ऑफ दि हँडीकॅप्ड, मिरजकर तिकटी अंधशाळा, कर्णबधिर विद्यालय, कागल येथील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी नृत्य व गायन सादरीकरण केले. केंद्राच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

0 9 DEC 2025
पुढारी

# विद्यापीठात महाराणी ताराबाई यांच्या जयंतीनिमित्त आजपासून राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर :** महाराणी ताराबाईंच्या ३५० व्या जयंतीचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठात 'महाराणी ताराबाई आणि अठरावे शतक : एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप' या विषयावर मंगळवारपासून (दि. ९) दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे.



विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग, शाहू संशोधन केंद्र, छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र आणि छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने चर्चासत्र होत आहे. पहिले सत्र मंगळवारी सकाळी ११.३० वाजता सुरू होईल. ज्येष्ठ इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार चर्चासत्राचे सूत्रभाष्य करतील. अध्यक्षस्थानी मानव्यविद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख असतील. दुसऱ्या सत्रात महाराणी ताराबाईंचे चरित्रकार डॉ. जयसिंगराव पवार यांची विशेष मुलाखत डॉ. नंदकुमार मोरे घेणार आहेत. त्यानंतर अमेरिकेच्या अरिझोना विद्यापीठातील ज्येष्ठ अमेरिकन इतिहासकार डॉ. रिचर्ड ईटन ऑनलाईन प्रणालीद्वारे दख्खनमधील महाराणी ताराबाईंचे कार्य, या विषयावर मते मांडतील. बुधवारी सायंकाळी ५ वाजता ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या प्रमुख उपस्थितीत चर्चासत्राचा समारोप होईल. अध्यक्षस्थानी डॉ. जयसिंगराव पवार असतील. चर्चासत्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, इतिहास विभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील, छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्राच्या संचालक डॉ. निलांबरी जगताप यांनी केले आहे.

09 DEC 2025
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात आज राज्यघटनेवर राष्ट्रीय चर्चासत्र

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, गांधी अभ्यासकेंद्र आणि समाज कल्याण विभाग, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने पीएम. उषा योजने अंतर्गत 'भारतीय राज्यघटना : मूलभूत संरचना सिद्धांताचा विकास' या विषयावर एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन केल्याची माहिती संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी दिली.

तरुण भारत संवाद
विद्यापीठातून

मंगळवारी १० वाजता संख्याशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात हे चर्चासत्र होणार आहे. चर्चा सत्राचे उद्‌घाटन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी प्रभारी प्र–कुलगुरू प्रा .डॉ. ज्योती जाधव उपस्थित असणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून समाज कल्याणचे सहायक आयुक्त सचिन साळे व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थित असणार आहेत.

पहिल्या सत्रात 'भारतीय संविधानाच्या परीप्रेक्ष्यात भारतीय प्रजासत्ताकाची वाटचाल', दुसऱ्या सत्रात सत्रात 'भारतीय राज्यघटनेचा मुलभूत संरचना सिद्धांत', तिसऱ्या सत्रात 'भारतीय राज्यघटनेचे तत्वज्ञान', चौथ्या सत्रात 'भारतीय राज्यघटना मूलभूत अधिकार, कर्तव्य, मार्गदर्शक तत्वे व मूलभूत संरचना सिद्धांत'विषयी मार्गदर्शन होणार आहे.

0 9 DEC 2025

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज भारतीय राज्यघटनेसंबंधी राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, गांधी अभ्यासकेंद्र व समाजकल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पी.एम. उषा योजनेंतर्गत मंगळवारी (दि.९) सकाळी १० वाजता संख्याशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी दिली. चर्चासत्राचे उद्घाटन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू प्रा. डॉ.ज्योती जाधव असणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त सचिन साळे, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. चर्चासत्र चार सत्रांत होणार असून पहिल्या सत्रामध्ये 'भारतीय संविधानाच्या परिप्रेक्ष्यात भारतीय प्रजासत्ताकाची वाटचाल' याविषयी माजी जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख मार्गदर्शन करणार आहेत. विद्यार्थी, शिक्षक व अभ्यागत यांनी चर्चासत्रास उपस्थित राहावे, असे आवाहन गांधी अभ्यास केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. प्रकाश पवार यांनी केले आहे.

09 DEC 2025
सकाळ



# 'भारतीय राज्यघटने'वर विद्यापीठात आज चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, गांधी अभ्यासकेंद्र आणि समाज कल्याण विभाग यांच्यातर्फे 'भारतीय राज्यघटना : मूलभूत संरचना सिद्धांताचा विकास' या विषयावर मंगळवारी (ता. ९) संख्याशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात होणार आहे. या चर्चासत्राचे उद्‌घाटन सकाळी दहा वाजता जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्याहस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आहेत. समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त सचिन साळे प्रमुख उपस्थित असणार आहेत. चर्चासत्रात निवृत्त सनदी अधिकारी लक्ष्मीकांत देशमुख, प्रा. डॉ. प्रकाश पवार, ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. श्रीराम पवार, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रा. डॉ. रणधीर शिंदे, प्रा. डॉ. भारती पाटील, एम. एस. देशमुख, एस. एच. पाटील, कृष्णा पाटील मार्गदर्शन करणार आहेत.

0 9 DEC 2025

जनप्रवास

# शिवाजी विद्यापीठात आज चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, गांधी अभ्यासकेंद्र आणि समाज कल्याण विभाग, कोल्हापूर यांच्या संयुक्त आज (दि. ९) सकाळी १० वाजता चर्चासत्र होणार आहे. विद्यमाने पीएम, उषा योजने अंतर्गत हे चर्चासत्र असून "भारतीय राज्यघटना मूलभूत संरचना सिद्धांताचा विकास हा या चर्चासत्राचा विषय आहे. चर्चासत्राचे उद्घाटन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थान प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव भुषवणार आहेत. समाज कल्याण सहाय्यक आयुक्त सचिन साळे व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

09 DEC 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात उद्यापासून तीन दिवसीय 'आयसीपीएम-एमडीएफ' आंतरराष्ट्रीय परिषद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागामार्फत १० ते १२ डिसेंबर या कालावधीत तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय परिषद : फिजिक्स ऑफ मटेरियल्स अँड मटेरियल्स बेस्ड डिव्हाईस फॅब्रिकेशन (आयसीपीएम-एमडीएफ-२०२५) हा विषय असणार आहे. ही माहिती आंतरराष्ट्रीय परिषदेचे अध्यक्ष, विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. राजेंद्र सोनकवडे यांनी दिली. परिषदेत जगभरातील नामवंत संशोधक, शास्त्रज्ञ व विचारवंत सहभागी होणार आहेत. राष्ट्रीय स्तरावरील विद्यार्थी, संशोधक व शिक्षकांना आंतरराष्ट्रीय पातळीवरील तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळण्याची आणि त्यांच्याशी संवाद साधण्याची संधी उपलब्ध होणार आहे. आंध्र प्रदेश, इंदूर, मुंबई, पुणे व कोल्हापूर यांसारख्या प्रमुख शैक्षणिक व संशोधन केंद्रांमधील संशोधक परिषदेत शोधनिबंध सादर करणार आहेत. विद्यार्थी, प्राध्यापक, वैज्ञानिक यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजन समितीने केले आहे.

09 DEC 2025
तरुण भारत

# विद्यापीठात उद्यापासून आंतरराष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागामार्फत 'फिजिक्स ऑफ मटेरियल्स अँड मटेरियल्स बेस्ड डिव्हाईस फॅब्रिकेशन' (आयसीपीएम–एमडीएफ–२०२५) पाचवी आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आल्याची माहिती परिषदेचे अध्यक्ष व भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. राजेंद्र सोनकवडे यांनी दिली. बुधवार दि. १० ते १२ रोजी दरम्यान तीन दिवसांच्या कालावधीत संपन्न होणार आहे. या परिषदेत जगभरातील नामवंत संशोधक, शास्त्रज्ञ आणि विचारवंत सहभागी होणार आहेत. त्यामुळे राष्ट्रीय स्तरावरील विद्यार्थी, संशोधक आणि शिक्षकांना आंतरराष्ट्रीय पातळीवरील तज्ज्ञांचे थेट मार्गदर्शन मिळण्याची आणि त्यांच्याशी संवाद साधण्याची एक दुर्मिळ सुवर्णसंधी उपलब्ध होणार आहे. या ज्ञानाच्या देवाणघेवाणीतून नवीन संकल्पनांचा उगम होईल आणि भविष्यातील संशोधनाची नवी दिशा निश्चित केली जाईल, असा विश्वास डॉ. सोनकवडे यांनी व्यक्त केला आहे. यामध्ये जपान आणि दक्षिण कोरियापासून ते युरोपातील जर्मनी, स्वीडन आणि आयर्लंडसारख्या संशोधनप्रधान देशांतील शास्त्रज्ञांचा समावेश असणार आहे.

0 9 DEC 2025

जनप्रवास



# शिवाजी विद्यापीठात उद्यापासून आंतरराष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागामार्फत आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली आहे. ही परिषद १० ते १२ डिसेंबर या कालावधीत होणार आहे. फिजिक्स ऑफ मटेरियल्स अँड मटेरियल्स बेस्ड डिव्हाइस फॅब्रिकेशन हा या परिषदेचा विषय आहे. परिषदेच्या अध्यक्षस्थानी भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. राजेंद्र सोनकवडे असणार आहेत. म्हैसूर, आंध्र प्रदेश, इंदूर, मुंबई, पुणे आणि कोल्हापूर यांसारख्या भारतातील प्रमुख शैक्षणिक आणि संशोधन केंद्रांमधील संशोधक या परिषदेत आपले शोधनिबंध सादर करतील.

09 DEC 2025
तरुण भारत

# संताजी जगनाडे महाराज जयंती साजरी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात सोमवारी संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये सोमवारी सकाळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी संत तुकाराम अध्यासनाचे समन्व्यक डॉ. नंदकुमार मोरे, उपकुलसचिव गजानन पळसे, ॲड. श्रीमती अनुष्का कदम, सहायक कुलसचिव सुरेश बंडगर, डॉ. सुखदेव एकल, प्रांजली क्षिरसागर, स्मिता राजमाने, पवन पाटील, रवि लोंढे यांच्यासह प्रशासकीय सेवक उपस्थित होते.

0 9 DEC 2025

जनप्रवास

# शिवाजी विद्यापीठात संत संताजी जगनाडे महाराज जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी संत तुकाराम अध्यासनाचे समन्व्यक डॉ. नंदकुमार मोरे, उपकुलसचिव गजानन पळसे, ॲड. अनुष्का कदम, सहाय्यक कुलसचिव सुरेश बंडगर, डॉ. सुखदेव एकल, प्रांजली क्षिरसागर, स्मिता राजमाने, पवन पाटील, रवि लोंढे आदी उपस्थित होते.

0 9 DEC 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठच्या हिवाळी सत्र परीक्षेला ५८ हजार १८० विद्यार्थी उपस्थित

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील परीक्षेला ५८ हजार १८० विद्यार्थी उपस्थित होते. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरू आहेत. सोमवारी बीए., बी.व्होक., एम.एस्सी, एमए., पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, बॅचलर ऑफ स्पेशल एज्युकेशन, बॅचलर ऑफ लॉ, मास्टर ऑफ लॉ, डिप्लोमा इन बिझनेस मॅनेजमेंट, बी.फार्मसी, बी.टेक. आदी ९० अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध १९१ केंद्रांवर सुरळीतपणे पार पडल्या. दि. ८ रोजी बीएच्या विविध सत्रांचे निकाल जाहीर करण्यात आले. आजअखेर ६७ अभ्यासक्रम घोषित करण्यात आले आहेत. भरारी पथकाकडून कोल्हापूर (१०), सातारा (०१), सांगली (०६)अशा एकूण १७ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.